महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ ०७ जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १९२ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### निवडणूक प्रचारात संयम आणि संवादाची गरज

महानगरपालिका निवडणुका म्हणजे नागरिकांना आपल्या शहराच्या विकासासाठी योग्य प्रतिनिधी निवडण्याची संधी. या प्रक्रियेत प्रचार हा महत्त्वाचा टप्पा असतो. मात्र प्रचारादरम्यान निर्माण होणारे वाद, तणाव किंवा गैरसमज हे लोकशाहीच्या सकारात्मक वातावरणाला बाधा आणू शकतात. काल मिरा रोडच्या काशिमीरा परिसरात प्रचाराच्या वेळी भाजप आणि शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या वादाकडे याच दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. या वादाची समाजमाध्यमांवर व्हायरल झालेली चित्रफीत, ही केवळ एका प्रभागापुरती मर्यादित घटना नाही, तर निवडणूक काळात वाढत चाललेल्या अस्वस्थ वातावरणाचे प्रतीक आहे. मिरा-भाईंदरमध्ये दोन्ही पक्ष स्वबळावर निवडणूक लढवत असल्याने अनेक प्रभागांत चुरशीची लढत दिसून येत आहे. अशा परिस्थितीत कार्यकर्त्यांचा उत्साह वाढणे स्वाभाविक आहे. मात्र हा उत्साह व्यक्त करताना संयम राखणे, एकमेकांबद्दल आदर ठेवणे आणि प्रचाराची पातळी वैचारिक चर्चेपुरती मर्यादित ठेवणे गरजेचे आहे. घडलेल्या प्रकारानंतर पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली, हे दिलासादायक आहे. दोन्ही बाजूंनी तक्रारी नोंदवण्यात आल्याने कायदेशीर मार्गाने प्रकरण हाताळले जात आहे. हे दर्शवते की प्रशासन सजग असून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तत्पर आहे. निवडणूक प्रचाराचा खरा उद्देश म्हणजे जनतेसमोर विकासाची दृष्टी, योजना आणि कामांचा लेखाजोखा मांडणे. व्यक्तिगत टीका, गैरसमज किंवा भावनिक उद्रेक यामुळे हा उद्देश बाजूला पडू नये, याची काळजी सर्व पक्षांनी घ्यायला हवी. सौम्य भाषा, संवाद आणि संयम यामुळेच मतदारांशी सकारात्मक नाते निर्माण होते. अशा घटनांकडून शिकत, पुढील काळात प्रचार अधिक सुसंस्कृत, मुद्देसूद आणि लोकशाही मूल्यांना साजेसा व्हावा, हीच अपेक्षा. शेवटी निवडणूक ही स्पर्धा असली, तरी ती सभ्यतेच्या चौकटीत आणि परस्पर सन्मानाने पार पडणे, हेच शहराच्या हिताचे ठरेल. निवडणूक जिंकणे महत्त्वाचे असले, तरी लोकशाहीची प्रतिष्ठा टिकवणे त्याहून अधिक महत्त्वाचे आहे, हे सर्व पक्षांनी आणि विशेषतः कार्यकर्त्यांनी लक्षात घेणे ही आजची गरज आहे.

# ठाण्यासाठी महायुतीचा निर्धारनामा

## ‘अब की बार सौ पार’; किमान १०० जागा जिंकण्याचा नेत्यांचा विश्वास




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**(प्रतिनिधी)**

**ठाणे : ठाणे महापालिका निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टी व शिवसेना महायुतीने ‘विकासाला गती, पर्याय एकच; भाजप–महायुती’ या घोषवाक्यासह ५४ कलमी निर्धारनामा जाहीर केला. यावेळी महापालिकेतील किमान १०० जागा महायुती नक्की जिंकेल, असा विश्वास भाजप नेत्यांनी व्यक्त केला.**

ठाणे भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या निर्धारनामा प्रकाशन सोहळ्यास माजी खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे, शिवसेना प्रदेश सचिव राम रेपाळे, प्रदेश प्रवक्ते सुजय पत्की, भाजप जिल्हाध्यक्ष संदीप लेले, प्रवक्ता सागर भदे आदी उपस्थित होते. महायुतीविषयी जनतेच्या मनात प्रचंड विश्वास असल्याने यंदा ‘अब की बार सो पार’ करत किमान १०० जागा जिंकू, असा विश्वास डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांनी व्यक्त केला. तर हा निर्धारनामा म्हणजे ठाण्याच्या सर्वांगीण विकासाची स्पष्ट रूपरेषा असल्याचे आमदार संजय केळकर यांनी सांगितले. शिक्षण व रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण करण्यावर भर देण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

**आरोग्य सुविधांसाठी कॅन्सर हॉस्पिटल, एम्सच्या धर्तीवर भव्य रुग्णालय, महिलांसाठी आरोग्य तपासणी व्हॅन्स उभारण्यात येणार आहेत. ठाणे शहराला सांस्कृतिक राजधानी म्हणून विकसित करण्यासाठी भव्य पार्क, नाट्यगृहे, फिल्म फेस्टिव्हल, स्ट्रीट आर्ट, संगीत महोत्सव, डिजिटल ग्रंथालये तसेच नवीन स्टेडियम उभारून आयपीएल व आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.**

निर्धारनाम्यात मिनी क्लस्टर योजना, २४ तास पाणीपुरवठा, पाण्याच्या पुनर्वापराचे धोरण, दर तीन महिन्यांनी प्रभागसभा व प्रभागनिहाय खर्चासाठी डिजिटल बोर्ड, तलावांचे सुशोभीकरण, कचरा व्यवस्थापन प्रकल्प व भूमिगत कचरा कुंड्या, दुबार नालेसफाईसह मलनिस्सारण ऑडिट यांचा समावेश आहे. सार्वजनिक वाहतूक बळकट करण्यासाठी टीएमटीचा दीर्घकालीन आराखडा, प्रत्येक मेट्रो स्थानकापासून मिनी बस नेटवर्क, आधुनिक पार्किंग स्टेशन व इंटर्नल रिंग मेट्रोचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे.



## बदलापूर शहरात राष्ट्रीय कीर्तन महोत्सवाला प्रारंभ

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**बदलापूर** : गेल्या २३ वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेल्या अंबरनाथ तालुका अध्यात्मिक उत्सव समितीच्या वतीने आयोजित राष्ट्रीय कीर्तन महोत्सव २०२६ ला आज भक्तिमय वातावरणात मंगलमय प्रारंभ झाला. वारकरी संप्रदायाची परंपरा, संस्कार आणि संतविचार जपणाऱ्या या महोत्सवाचे उद्घाटन विधिवत धार्मिक विधींनी करण्यात आले

उद्घाटनप्रसंगी विघ्नहर्ता श्री गणरायाची पूजा करण्यात आली. त्यानंतर वारकरी परंपरेचे प्रतीक असलेल्या टाळ, वीणा व मृदंग यांचे भक्तिभावाने पूजन करून अध्यात्मिक सोहळ्याची सुरुवात झाली. या वेळी उपस्थित भाविकांमध्ये उत्साह व भक्तिरसाचे वातावरण पाहायला मिळाले.

महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी पैठण येथील श्रीनाथ संस्थानाधिपती संत एकनाथ महाराजांचे १४ वे वंशज व उत्तराधिकारी ह.भ.प. डॉ. श्री. पुष्कर महाराज गोसावी यांचे सुश्राव्य कीर्तन पार पडले. त्यांच्या ओघवत्या शैलीतील कीर्तनाने आणि संतविचारांनी भाविक मंत्रमुग्ध झाले.

या वेळी बोलताना आमदार किसन कथोरे (मुरबाड) यांनी अशा अध्यात्मिक महोत्सवांचे सामाजिक महत्त्व अधोरेखित केले. “अशा उपक्रमांमुळे समाजात सद्भावना, संस्कार आणि एकात्मतेची भावना वृद्धिंगत होते. वारकरी संप्रदायाची समृद्ध परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या माध्यमातून होत आहे,” असे ते म्हणाले.

या कीर्तन महोत्सवाचा लाभ घेण्यासाठी बदलापूर शहरातील व परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अंबरनाथ नगरपरिषदेत सत्तास्थापनेसाठी नव्या राजकीय समीकरणांची आखणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**अंबरनाथ : अंबरनाथ नगरपरिषदेत सत्ता स्थापन करण्यासाठी भाजपने स्वीकारलेली नवी रणनीती सध्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे. ‘काँग्रेसमुक्त भारत’चा नारा देणाऱ्या भाजपने अंबरनाथमध्ये बहुमताचा आकडा गाठण्यासाठी काँग्रेससह इतर पक्षांशी समन्वय साधल्याने स्थानिक राजकारणात नवे समीकरण आकारास येत आहे.**

अंबरनाथ नगरपरिषद निवडणुकीत भाजपच्या तेजश्री करंजुळे नगराध्यक्ष म्हणून विजयी झाल्या आहेत. सध्याच्या परिस्थितीत भाजपचे १६, काँग्रेसचे १२ आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे ४ नगरसेवक असे एकूण ३२ नगरसेवक एकत्र येत बहुमताचा आकडा पूर्ण होण्याची शक्यता आहे. या माध्यमातून स्थिर व कार्यक्षम प्रशासन देण्याचा भाजपचा प्रयत्न असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, या घडामोडींवर शिवसेना (शिंदे गट) ने नाराजी व्यक्त केली असून, त्यांनी या समीकरणावर टीका केली आहे. आमदार बालाजी किणीकर यांनी भाजपच्या या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले असले, तरी भाजपकडून मात्र ही स्थानिक विकास आणि नगरहितासाठीची व्यावहारिक राजकीय भूमिका असल्याचे सांगितले जात आहे. एकूणच, अंबरनाथ नगरपरिषदेत निर्माण झालेले हे नवे राजकीय समीकरण आगामी काळात शहराच्या विकासाला गती देणारे ठरेल का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अडीच लाख रिक्त पदे भरा!
### राजपत्रित अधिकारी महासंघाचे सरकारला पत्र

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई** : राज्य सरकारच्या विविध विभागातील ३ टक्के पदे दरवर्षी सेवानिवृत्तीने रिक्त होत असतात तर सध्या राज्यभरातील विविध विभागातील अडीच लाख पदे रिक्त आहेत. यामुळे उर्वरित कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडतो. राज्य सरकारने लोकसेवा आयोग, जिल्हा निवड मंडळे इत्यादी मार्गाने निश्चित कालावधीत भरण्यात यावीत, अशी मागणी महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाने केली आहे. याबाबत संघाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले आहे.

# बिनविरोध विजयी उमेदवारांवर अपात्रतेची टांगती तलवार !

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई, ता. ५** : राज्यात सुरू असलेल्या महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांवर कायदेशीर संकट घोंघावत असल्याचे चित्र आहे. राज्यभरातील विविध महापालिकांमध्ये काही जागांवर उमेदवार बिनविरोध निवडून आले असले, तरी त्यांच्या विजयावर सध्या अपात्रतेची टांगती तलवार कायम आहे. या उमेदवारांचे अधिकृत निकाल १६ जानेवारीपर्यंत जाहीर होणार नसले, तरी त्यांच्याविरोधात दाखल झालेल्या तक्रारींची सखोल शहानिशा निवडणूक आयोगाकडून सुरू आहे. निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, बिनविरोध निवडीदरम्यान उमेदवारी अर्जातील त्रुटी, अपूर्ण कागदपत्रे, चुकीची माहिती, आरक्षणाच्या अटींचे उल्लंघन किंवा माघार प्रक्रियेत झालेल्या अनियमिततेबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारींमध्ये तथ्य आढळल्यास संबंधित उमेदवारांची निवड रद्द करण्यात येऊ शकते. अशा परिस्थितीत त्या प्रभागात पुन्हा निवडणूक घेण्याचा अधिकार आयोगाकडे राहणार आहे. विशेषतः माघार घेणाऱ्या उमेदवारांकडून करण्यात आलेल्या तक्रारी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जात असून, अशा तक्रारींची गंभीर दखल घेतली जात आहे. एखाद्या उमेदवाराने दबाव, आमिष किंवा अन्य कारणांमुळे माघार घेतल्याचा ठोस पुरावा आढळल्यास बिनविरोध निवड अवैध ठरवली जाऊ शकते, असे आयोगाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. राजकीय पक्षांचे दावे किंवा स्पष्टीकरण याला कायदेशीर प्रक्रियेत फारसे महत्त्व दिले जाणार नसून, निव्वळ पुरावे आणि नियमांच्या आधारेच निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांमध्येही अस्वस्थता पसरली असून, अधिकृत निकाल जाहीर होईपर्यंत त्यांचा विजय निश्चित मानता येणार नाही, अशी स्थिती आहे. आयोगाच्या चौकशीचा निष्कर्ष काय लागतो याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

**माघार घेतलेल्या उमेदवारांकडून आलेल्या तक्रारी निवडणूक आयोग अत्यंत गांभीर्याने घेत आहे. दबाव, आमिष किंवा अन्य कारणांमुळे माघार घेतल्याचे ठोस पुरावे आढळल्यास निवड अवैध ठरवली जाऊ शकते, असा इशारा आयोगाने दिला आहे. राजकीय पक्षांचे दावे नव्हे तर केवळ पुरावे व नियमांच्या आधारेच निर्णय घेतला जाईल. त्यामुळे बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांमध्येही अनिश्चितता असून, अधिकृत निकाल व चौकशीच्या निष्कर्षाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

## महत्वाचे






निवडणूक पार्श्वभूमीवर
### कल्याण-डोंबिवलीत कडेकोट पोलीस बंदोबस्त

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**कल्याण /प्रतिनिधी (दि.6)**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ च्या पार्श्वभूमीवर परिमंडळ-३, कल्याण अंतर्गत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत व निर्भय वातावरणात पार पडावी यासाठी व्यापक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात आल्याची माहिती पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी दिली. परिमंडळ-३ अंतर्गत ३१ प्रभागांमध्ये ३४४ मतदान केंद्रे व १,४५७ मतदान बूथ निश्चित करण्यात आले असून मतदानाच्या दिवशी चोख बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. यासाठी VST, FST व ९ SST पथके तैनात करण्यात आली असून ४९ पोलीस सेक्टर तयार करण्यात आले आहेत. निवडणूक काळात १,३०१ शस्त्रांपैकी १,११० शस्त्र जमा करण्यात आली आहेत. तसेच मपोका, एमपीडीए, एमसीओसीए व विविध भा.ना.सु.सं. कलमांअंतर्गत २,५२७ प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात आल्या आहेत. अवैध दारू, अमली पदार्थ व शस्त्रांविरोधात विशेष मोहिमेदरम्यान रोख ९ लाख रुपयांची रक्कम जप्त करण्यात आली आहे. सुरक्षेसाठी ४ कोम्बिंग ऑपरेशन, ९ रूट मार्च व ७ दंगा नियंत्रण योजना राबविण्यात आल्या असून २४ ड्रोनद्वारे मतदान व मतमोजणीवर नजर ठेवण्यात येणार आहे. मतदान यंत्रांच्या सुरक्षेसाठी एक मुख्य व ९ आरओ स्तरावरील स्ट्रॉंगरूम सज्ज ठेवण्यात आल्या आहेत.

# एसटीच्या ताफ्यात 8 हजार नव्या बस

## दिरंगाई करणाऱ्यांवर कारवाई – परिवहनमंत्री

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**दि.6. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताफ्यात २०२६ अखेर आठ हजार नवीन बस दाखल होतील, अशा पद्धतीने निविदा प्रक्रिया राबवण्याचे स्पष्ट निर्देश परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. या प्रक्रियेत कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नसून, विलंब झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरून कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.**

एसटी महामंडळाच्या २०२५-२६ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय निधीच्या वापराबाबतच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, आर्थिक सल्लागार गिरीश देशमुख तसेच विविध विभागांचे खातेप्रमुख उपस्थित होते.

यावेळी मंत्री सरनाईक यांनी एसटी महामंडळाच्या विविध विभागांच्या संथ कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात एसटी महामंडळासाठी राज्य सरकारने २ हजार ४६० कोटी रुपयांची तरतूद केली असून, या निधीचा वेळेत व प्रभावी वापर होणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रवाशांना सुरक्षित, आरामदायी व वेळेत सेवा देण्यासाठी बस ताफा अद्ययावत करणे गरजेचे असून, नवीन बस खरेदी प्रक्रिया गतीने पूर्ण करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. एसटीची सेवा अधिक सक्षम करण्यासाठी प्रशासनाने जबाबदारीने काम करावे, अशी अपेक्षा मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केली.

# ठाण्यातील निवडणूक अधिकारी वादाच्या भोवऱ्यात

## निवडणूक आयोगाकडून गंभीर दखल ● निरिक्षक आणि आयुक्तांकडून मागविला अहवाल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : मनमानी पद्धतीने काम केल्यावरून ठाण्यातील एक निवडणूक निर्णय अधिकारी वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. उमेदवारांचे अर्ज पडताळणीसाठी सार्वजनिकरित्या उपलब्ध करुन देण्यात हयगय करतानाच सत्ताधाऱ्यांचे उमेदवार बिनविरोध निवडूण येण्यासाठी मदत केल्याच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या आरोपांची राज्य निवडणूक आयोगाने गंभीर दखल घेत या प्रकरणी पालिका निवडणूक निरीक्षक आणि महापालिका आयुक्तांकडून अहविला मागविला आहे. ठाणे महापालिकेच्या वागळे इस्टेट निवडणूक केंद्राच्या निवडणूक निर्णय अधिकारी वृषाली पाटील यांच्या कार्यपद्धतीवर मनसेने आक्षेप घेत त्यांच्यावर कारवाईची मागणी केली आहे. या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या अंतर्गत येणाऱ्या पालिका प्रभाग क्रमांक १६,१७ आणि १८ मधून शिवसेनेचे (शिंदे) उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. मात्र अर्ज छाननी आणि माघार घेण्याच्या प्रक्रियेत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नियमबाह्य काम केल्याचा आरोप मनसेचे ठाणे जिल्हा अध्यक्ष अविनाश जाधव यांनी केला आहे. जाधव यांनी सोमवारी राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांची भेट घेऊन वृषाली पाटील यांच्यावर कारवाईची मागणी केली. उमेदवारांचे अर्ज पडताळणीसाठी सार्वजनिकरित्या दुपारी साडेतीन वाजेपर्यंत उपलब्ध करण्यात आले नव्हते. हे पाटील यांनी स्वतः मान्य केले असून अशा भ्रष्ट अधिकारीची तत्काळ हकालपट्टी करावी, अशी मागणी जाधव यांनी निवडणूक आयुक्तांकडे केली आहे.



# खेलो इंडिया बीच कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे पुरुष व महिला संघ जाहीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : दिव, गुजरात येथे होणाऱ्या "२ऱ्या खेलो इंडिया बीच कबड्डी" स्पर्धेकरिता महाराष्ट्राचे संघ जाहीर करण्यात आले आहेत. मुंबईच्या साहिल राणे कडे पुरुषाचे, तर रत्नागिरीच्या समरीन बुरोंडाकर कडे महिलांचे नेतृत्व सोपवण्यात आहे आहे.

गुजरात, दिव येथे ५ ते ९ जानेवारी २०२६ या कालावधीत होणाऱ्या "२ऱ्या खेलो इंडिया बीच कबड्डी" स्पर्धेकरिता महाराष्ट्राने आपले दोन्ही संघ जाहीर केले असून मुंबई शहरचा साहिल राणे आणि रत्नागिरीच्या समरीन बुरोंडकर यांच्या खांद्यावर अनु. पुरुष व महिला गटाच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. पुरुष संघाच्या प्रशिक्षकाची जबाबदारी आंतर राष्ट्रीय खेळाडू, प्रो कबड्डी स्टार निलेश शिंदे यांच्याकडे सोपविली आहे. तर महिलांचे प्रशिक्षक आहेत संतोष शिर्के. दोन्ही संघाचे व्यवस्थापक म्हणून अरविंद देशमुख हे काम पहातील. निवडण्यात आलेले हे दोन्ही संघ स्पर्धेकरिता दिवला रवाना झाले.

**निवड करण्यात आलेले संघ**

| पुरुष संघ : | महिला संघ : |
|---|---|
| १) साहिल राणे (संघनायक) | १) समरीन बुरोंडकर (संघनायिका) |
| २) संकेत सावंत | २) पौर्णिमा जेधे |
| ३) दादासो पुजारी | ३) पूजा यादव |
| ४) सूरज दूंदले | ४) निकिता पडवळ |
| ५) आदित्य शिंदे | ५) समृद्धी मोहिते |
| ६) अभिषेक गुंगे | ६) हर्षा शेट्टी |
| **प्रशिक्षक : निलेश शिंदे** | **प्रशिक्षक : संतोष शिर्के** |

**दोन्ही संघांचे व्यवस्थापक : अरविंद देशमुख**

# ओल्ड रॉक डे : पृथ्वीच्या इतिहासाची साक्ष देणारे दगड



दरवर्षी ७ जानेवारी रोजी ओल्ड रॉक डे साजरा केला जातो. हा दिवस ऐकायला साधा वाटत असला तरी त्यामागे पृथ्वीच्या कोट्यवधी वर्षांच्या इतिहासाची आठवण करून देणारा मोठा संदेश दडलेला आहे. आपल्या आजूबाजूला दिसणारे दगड, खडक आणि पर्वतरांगा केवळ निर्जीव वाटणाऱ्या वस्तू नसून, त्या पृथ्वीच्या उत्क्रांतीची जिवंत साक्ष आहेत.

पृथ्वीची निर्मिती, वातावरणातील बदल, ज्वालामुखींचे उद्रेक, हिमयुग, नद्यांचे प्रवाह आणि जीवसृष्टीचा विकास या सर्व प्रक्रियांची माहिती खडकांमधून मिळते. भूशास्त्रज्ञ दगडांच्या थरांचा अभ्यास करून लाखो-कोट्यवधी वर्षांपूर्वीच्या घटनांचा मागोवा घेतात. त्यामुळे दगड म्हणजे पृथ्वीच्या इतिहासाचे जतन केलेले पानच म्हणावे लागेल.

आजच्या आधुनिक जीवनात आपण काँक्रीट, सिमेंट आणि इमारतींमध्ये इतके गुंतलो आहोत की निसर्गातील या मूलभूत घटकांकडे दुर्लक्ष होत आहे. मात्र जलस्रोतांची निर्मिती, खनिज संपत्ती, शेतीसाठी सुपीक जमीन तसेच पर्यावरणीय समतोल राखण्यात खडकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अनेक नद्या, धबधबे आणि पर्वत रांगा या खडकांमुळेच अस्तित्वात आहेत.

ओल्ड रॉक डे हा दिवस आपल्याला निसर्गाशी पुन्हा जोडण्याची संधी देतो. या दिवशी शाळा, महाविद्यालये, संग्रहालये आणि पर्यावरणप्रेमी संस्था भूशास्त्रीय माहितीपर उपक्रम, प्रदर्शन आणि निसर्गभ्रमंतीचे आयोजन करतात. याद्वारे नव्या पिढीला निसर्गाचा इतिहास समजून घेण्याची प्रेरणा मिळते.

**भूशास्त्राच्या अभ्यासानुसार पृथ्वीवरील काही खडकांचे वय ४ अब्ज वर्षांपेक्षा अधिक आहे. या खडकांमधील थर, खनिजे आणि जीवाश्मांमधून त्या काळातील हवामान, वनस्पती, प्राणी आणि पर्यावरणीय परिस्थितीची माहिती मिळते. त्यामुळेच खडकांना "पृथ्वीचे इतिहासग्रंथ" असेही म्हटले जाते.**

**आजच्या औद्योगिक युगात खाणकाम, अनियंत्रित बांधकाम आणि पर्यावरणीय ऱ्हासामुळे भूवैज्ञानिक वारसा धोक्यात आला आहे. अनेक ऐतिहासिक खडक, गुहा आणि नैसर्गिक रचना नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. ओल्ड रॉक डे हा दिवस आपल्याला या वारशाचे संरक्षण करण्याची जबाबदारी आठवण करून देतो.**

**पर्वतरांगा, पठारे, नद्या आणि समुद्रकिनारे यांची निर्मिती खडकांमुळेच झाली आहे. भारतातील सह्याद्री पर्वतरांग, दख्खनचे पठार तसेच कोकणातील काळे बेसॉल्ट खडक हे भूवैज्ञानिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे आहेत. दख्खन ट्रॅपसारख्या खडकांमुळेच महाराष्ट्रातील माती सुपीक झाली असून शेतीसाठी ती उपयुक्त ठरली आहे.**

आज पर्यावरणीय ऱ्हास, खाणकामामुळे होणारे नुकसान आणि निसर्गाचा होत असलेला विनाश पाहता, दगड आणि खडकांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. निसर्गाचा इतिहास जपणे म्हणजेच भविष्य सुरक्षित करणे होय. म्हणूनच, ओल्ड रॉक डे केवळ दगडांविषयीचा दिवस नसून, तो पृथ्वीच्या दीर्घ प्रवासाची जाणीव करून देणारा आणि निसर्ग संवर्धनाचा संदेश देणारा महत्त्वाचा दिवस आहे.

# भिवंडीत पोलिस कर्मचाऱ्याशी गैरवर्तन तोडफोडीचा प्रकार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी शहरातील उप कारागृहात (सब जेल) मध्ये कर्तव्यावर हजर असलेल्या एका पोलिस हवालदाराची कॉलर पकडून त्यांना शिवीगाळ करून कारागृहातील सीसीटीव्ही व बल्ब ची तोडफोड करून दहशत पसरवून शासकीय कामात अडथळा आणल्याची खळबळजनक घटना नुकतीच घडली आहे.त्यामुळे याप्रकरणी आरोपीच्या विरोधात शांतीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फैय्याज इस्लाम शेख (२५ रा.मुंब्रा) असे आरोपीचे नाव आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,फैय्याज याच्या विरोधात कलम ३५३ अन्वये गुन्हा दाखल आहे.तर ४ डिसेंबर रोजी सकाळी १०:३० वाजताच्या सुमारास पोलीस हवलदार सचिन कृष्णा जगताप (४९) हे शासकीय कर्तव्य बजावत असताना आरोपी फैय्याज ने सबजेल मध्ये मोठ मोठ्याने आरडा ओरड करीत असल्याने पोलिसांनी त्यास शांत राहण्यास सांगितले त्यामुळे रागाच्या भरात त्याने हवालदार सचिन यांची कॉलर पकडून त्यांना शिवीगाळ सह धमकावले आहे.तसेच ब जेल मधील तीन सीसीटीव्ही कॅमेरे आणि तीन बल्ब फरशीवर आपटून फोडून नुकसान केले आहे. त्यामुळे याप्रकरणी हवालदार सचिन जगताप यांच्या फिर्यादीवरून फैय्याज च्या विरोधात शांतीनगर पोलिस ठाण्यात भान्यासं कलम १३२,३५२, ३५१ (२) अन्वये गुन्हा दाखल केला असून त्यास कलम ३५ (३) प्रमाणे नोटीस देण्यात आली आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सचिन देसाई करीत आहेत.

# ड्रग्ज विरोधात रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणची व्यापक जनजागृती मोहीम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** समाजाला पोखरणाऱ्या अमली पदार्थांच्या वाढत्या प्रादुर्भावाला आळा घालण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग हे पूर्णतः ॲक्शन मोडवर आले असून संपूर्ण रायगड जिल्ह्यात ड्रग्जविरोधी व्यापक जनजागृती व प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. या संदर्भातील आढावा व नियोजन सभा रायगड जिल्ह्याचे मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

यावेळी जिल्हा न्यायाधीश सृष्टी निळकंठ यांनी सांगितले की, ड्रग्ज विरोधातील लढा यशस्वी करायचा असेल तर सर्व शासकीय यंत्रणा, पोलीस प्रशासन, शैक्षणिक संस्था तसेच समाजातील विविध घटकांनी एकत्र येऊन समन्वयाने कार्य करणे अत्यंत आवश्यक आहे. ड्रग्जचा वाढता प्रसार ही गंभीर सामाजिक समस्या असून, सामूहिक प्रयत्नांतूनच त्यावर प्रभावी नियंत्रण मिळवता येईल असे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव तेजस्विनी निराळे यांनी माहिती देताना सांगितले की, रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर जनजागृती कार्यक्रम राबविण्याची नितांत गरज आहे. त्यासाठी शाळा व महाविद्यालयांमध्ये अवेअरनेस प्रोग्राम, पथनाट्य, पोस्टर स्पर्धा, निबंध लेखन (Essay Writing), व्याख्याने व संवादात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या माध्यमातून विद्यार्थी व युवकांपर्यंत ड्रग्जचे दुष्परिणाम, संबंधित कायदे व प्रतिबंधात्मक उपाय प्रभावीपणे पोहोचविले जाणार आहेत. तसेच राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून दि. 05 ते 12 जानेवारी 2026 या कालावधीत 'डॉन योजना' (Drug awareness and wellness for a drug free india) अंतर्गत विशेष ड्रग्जविरोधी जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या कालावधीत युवक-केंद्रीत कार्यक्रमांवर विशेष भर देण्यात येणार असून, शाळा-महाविद्यालये, सार्वजनिक ठिकाणे व संवेदनशील भागांमध्ये प्रतिज्ञा कार्यक्रम, कायदेशीर मार्गदर्शन शिबिरे, पोस्टर-बॅनर प्रदर्शन, पथनाट्य तसेच जनसंवाद उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. सध्याच्या पिढीमध्ये अमली पदार्थांचे वाढते प्रमाण ही अत्यंत चिंताजनक बाब असून, योग्य वेळी जनजागृती करणे व पोलिसांच्या माध्यमातून सातत्याने आढावा घेणे आणि प्रतिबंधात्मक कारवाई करणे तितकेच महत्त्वाचे असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

या मोहिमेच्या अंमलबजावणीसाठी विधी स्वयंसेवक (PLV), पोलीस प्रशासन, शैक्षणिक संस्था व सामाजिक संघटनांचे सहकार्य घेण्यात येत आहे. या बैठकीस रायगड जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांचे प्रतिनिधी, पोलीस अधीक्षक, शिक्षणाधिकारी (महाविद्यालय विभाग) तसेच विविध संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

ड्रग्जमुक्त, सुदृढ आणि सुरक्षित रायगड घडविण्यासाठी सर्व नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे करण्यात आले.

# दहागाव ग्रामपंचायतीने राबविला स्वच्छता अभियान उपक्रम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण :** वासिंद जवळील ग्रुप ग्रामपंचायत दहागाव -कातबाव -चाफ्याचापाडा यांनी २०२६ या नविन वर्षाच्या पूर्वसंध्येला ग्रामपंचायत अंतर्गत दहागाव,देसलेपाडा,पवारपाडा, कातबाव व चाफ्याचापाडा येथे गावपाड्यावर स्वच्छता मोहीम हाती घेऊन स्वच्छ ग्रामपंचायत अभियान हा उपक्रम राबविण्यात आला. यासाठी चारही गावातील महिलांनी उस्फूर्तपणे मोठ्या संख्येने सहभाग घेतला तसेच ग्रामपंचायत सरपंच,उपसरपंच व सदस्य यांनीही सहभाग घेतला, वर्धमान वाटिका येथील गृह संकुलाने स्वच्छतेसाठी चार दिवस जेसीबी उपलब्ध करून दिला तर मिलन रोड बिलटेच कंपनीने चार दिवस रोज 6 मजूर





उपलब्ध करुन दिले तसेच माजी उपसरपंच राजदीप जामदार व ज्ञानेश्वर मसणे यांनी मोफत चार दिवस ट्रॅक्टरची व्यवस्था करून येथील स्वच्छता अभियानाला मोठा हातभार लावून दिला या सर्वांच्या सहकार्याने गावातील केरकचरा, जि प शाळेचा परिसर,गावातील अंतर्गत रस्ते यांची साफसफाई करून स्वच्छता अभियान राबविले यावेळी स्वच्छता अभियान मोहिमेत सहभागी झालेल्या सर्वांना येत्या २६जानेवारी२०२६ या प्रजासत्ताक दिनी सन्मान व सत्कार करण्यात येणार आहे. या ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी दिनकर यांचेही विशेष मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# वाड्यात विद्यार्थिनीस धार्मिक आचरणासाठी दबाव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाडा :** वाडा तालुक्यातील पोशेरी येथील आयडियल फाऊंडेशन कॉलेजच्या वसतिगृहात एका विद्यार्थिनीस मानसिक दबाव व त्रास दिल्याचा प्रकार उघडकीस आला असून या प्रकरणी वाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनीसोबत प्रकार**

नाशिक जिल्ह्यातील आरती (नाव बदलले आहे) या विद्यार्थिनीने काही दिवसांपूर्वी फिजिओथेरपी अभ्यासक्रमासाठी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला होता. ती वसतिगृहात इतर विद्यार्थिनींसोबत राहत होती.

**रात्रीच्या वेळी घडलेली घटना**

४ जानेवारी रोजी रात्री सुमारे ११ ते १२ वाजण्याच्या सुमारास पाणी आणण्यासाठी जात असताना सहाव्या मजल्यावरून उतरताना एका अज्ञात विद्यार्थिनीकडून तिच्याशी गैरवर्तन करण्यात आल्याची तक्रार विद्यार्थिनीने केली आहे.

**मानसिक दबाव टाकल्याचा आरोप**

फिर्यादीनुसार, संबंधित विद्यार्थिनीकडून धार्मिक आचरण करण्यासाठी दबाव टाकण्यात आला. नकार दिल्यानंतर भीतीचे वातावरण निर्माण केल्याचा आरोप तक्रारीत नमूद करण्यात आला आहे.

**कुटुंबीयांना व प्रशासनाला माहिती**

घटनेनंतर घाबरलेल्या विद्यार्थिनीने दुसऱ्या दिवशी सकाळी आपल्या पती व वडिलांना माहिती

**पोशेरी येथील आयडियल महाविद्यालयातील धक्कादायक प्रकार**

दिली. तसेच वसतिगृहाच्या वॉर्डनकडेही तक्रार करण्यात आली.

**तक्रारीनंतर पोलीस तपास सुरू**

प्रकरणाची गंभीर दखल घेत पालघरचे पोलीस अधीक्षक यतिश देशमुख यांच्यासह स्थानिक पोलीस व गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळी भेट देत तपास सुरू केला.

**रॅगिंगचा संशय गुन्हा दाखल**

प्राथमिक चौकशीत हा प्रकार रॅगिंगशी संबंधित असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमे व रॅगिंग प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**कॉलेज प्रशासनावर कारवाई**

या प्रकरणात कॉलेज प्रशासनाकडून हॉस्टेल वॉर्डन व एक शिक्षक यांना निलंबित करण्यात आले आहे.

**तपास सुरू कठोर कारवाईचा इशारा**

सीसीटीव्ही फुटेज, इतर विद्यार्थिनींचे जबाब व पुराव्यांच्या आधारे तपास सुरू असून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे पोलीस अधीक्षक यतिश देशमुख यांनी स्पष्ट केले आहे.

# जनार्दन भेरे यांना उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भातसानगर, दि. ६**

पत्रकार दिनाचे औचित्य साधून मी ठाणेकर न्यूज नेटवर्क आयोजित शहापूर तालुका पत्रकारांच्या स्नेहसंमेलनात लोकमतचे पत्रकार जनार्दन भेरे यांना प्रिंट मीडियातील उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार शहापूरचे पोलीस निरीक्षक मुकेश ढगे व इतर मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला. ग्रामीण भागातील निस्वार्थ पत्रकारिता व शेतकरी-गरजूंचे प्रश्न सातत्याने मांडल्याबद्दल त्यांची निवड करण्यात आली. शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व रोख 5 हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप होते.

जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक
निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/मोप्र-१/दि.३०/११/२०१८ चे प्रपत्र

**मृद व जलसंधारण विभाग**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी**

मृद व जलसंधारण विभाग, कळवा, ठाणे. यांचे कार्यालय
कडा वसाहत, सहकार विद्यालयासमोर, जुना मुंबई-पुणे रोड. कळवा (प)
दूरध्वनी क्रमांक - 022-25428127 ई-मेल ccmilsdnt@gmail.com

**ई-निविदा सुचना क्र.ब-१/८०/ सन २०२५-२६**

जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा-ठाणे, मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील निविदा सीलबंद लिफाफ्यात मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा-ठाणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| **कामाचे नांव** | :- | **मौजे काकोळे-पुलाजवळ गेटेड सिमेंट कॉक्रीट बंधारा बांधणे ता. अंबरनाथ जि ठाणे.** |
| **निविदेची अंदाजित किंमत** | :- | रु. ४२,७८,४०७/- |
| **ई-निविदा उपलब्ध कालावधी** | :- | दिनांक : ०७/०१/२०२६ ते दिनांक १४/०१/२०२६. |
| **ई-निविदा भरण्याचा कालावधी** | :- | दिनांक : ०७/०१/२०२६ ते दिनांक १५/०१/२०२६. |
| **ई-निविदा उघडणे** | :- | दिनांक : १६/०१/२०२६ (शक्य झाल्यास) |

**खालील ठिकाणी ई-निविदा बाबतची सर्व माहिती उपलब्ध आहे.**

१. संकेतस्थळ http://mahatenders.gov.in (सदर निविदा सुचना मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल)
२. संकेतस्थळ जाहिरातीची माहिती http://www.cemilspn.in
३. जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, ठाणे यांचे कार्यालयातील सुचना फलकावर.

जा.क्र. : जिजअ/मृवजवि/ठाणे/लेशा-२/१०३/२०२६
दिनांक : ०५.०१.२०२६
कार्यालय : जिल्हा जलसंधारण अधिकारी
मृद व जलसंधारण विभाग. कळवा-ठाणे

सही/-
(फरीद खान)
जिल्हा जलसंधारण अधिकारी
मृद व जलसंधारण विभाग
कळवा- ठाणे

जा. क्र. : जिमाका /ठाणे/जाहि/2025-26/160

# बदलणारा मीडिया : राजेंद्र हुंजे यांचे फेसबुक लाईव्ह वेबिनार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा/वार्ताहर**



जीवनदीप महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक विकासासाठी सातत्याने नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत आहे. याच उपक्रमांच्या मालिकेत महाविद्यालयातील पत्रकारिता विभागाच्या वतीने 'बदलणारा मीडिया' या विषयावर विशेष फेसबुक लाईव्ह वेबिनारचे आयोजन मंगळवार, दिनांक ०६ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आले. आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर जयंती व पत्रकार दिनाचे औचित्य साधून या वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. या वेबिनारसाठी ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र हुंजे यांना प्रमुख मार्गदर्शक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून त्यांनी माध्यम क्षेत्रातील बदलते प्रवाह, डिजिटल मीडियाचे वाढते महत्त्व, सोशल मीडियाची भूमिका, तसेच पत्रकारितेतील संधी आणि आव्हाने यावर सखोल मार्गदर्शन केले. बदलत्या काळात पत्रकारितेची जबाबदारी, मूल्यनिष्ठ पत्रकारितेचे महत्त्व आणि विद्यार्थ्यांनी करिअर घडवताना कोणत्या बाबींकडे लक्ष द्यावे, याबाबत त्यांनी मौलिक विचार मांडले. कार्यक्रमादरम्यान पत्रकारिता विभागातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. त्यांनी पत्रकारितेतील करिअर, डिजिटल मीडिया, फेक न्यूज, तसेच भविष्यातील संधी यासंबंधी प्रश्न विचारले, ज्यांचे समाधानकारक उत्तर राजेंद्र हुंजे यांनी दिले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी पत्रकारिता विभाग प्रमुख प्रा. डॉ. राहुल तौर, प्रा. मोहन गारे, प्रा. निलेश कुंभार उपस्थित होते. तसेच जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष रविंद्र घोडविंदे, संचालक प्रशांत घोडविंदे, प्राचार्य डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे यांचे मार्गदर्शन लाभले.

शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या एकत्रित सहकार्याने हा वेबिनार यशस्वीरीत्या पार पडला. विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरलेला हा उपक्रम विशेष कौतुकास पात्र ठरला.

# उल्हासनगरात भाजपकडून संघटन मजबूतीवर भर

## पक्षांतर्गत मतभेद विसरून एकसंघपणे काम करा - रविंद्र चव्हाण

**■ या निवडणुकीत राष्ट्रीय पक्षांबरोबरच स्थानिक पातळीवर प्रभावी पकड असलेल्या गटांनीही जोरदार तयारी केली आहे. भाजप, शिंदे गट व ठाकरे गट यांच्यातील समीकरणे ढवळून निघाल्याने राजकीय अनिश्चितता वाढली आहे. त्याचबरोबर टीम ओमी कलानी, साई पक्ष, काँग्रेस, अजित पवार गट, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, वंचित बहुजन आघाडी, आम आदमी पार्टी आणि बसपा अशा विविध पक्षांची मजबूत फळी मैदानात उतरली आहे. त्यामुळे सत्तेच्या चाव्या कोणाच्या हाती जाणार, याबाबत राजकीय वर्तुळात तर्क-वितर्क सुरू आहेत.**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उल्हासनगरमध्ये भारतीय जनता पक्षाने संघटनात्मक पातळीवर जोरदार तयारी सुरू केली आहे. भाजपचे ठाणे जिल्हा उपाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी शहरातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि बूथस्तरीय जबाबदार कार्यकर्त्यांची बैठक घेऊन निवडणुकीसाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. पक्षांतर्गत मतभेद बाजूला ठेवून एकसंघपणे काम केल्यास विजय निश्चित असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. उल्हासनगरमध्ये भाजपची संघटना अधिक बळकट करण्यासाठी बूथनिहाय रणनीती आखण्यात येत असून, प्रत्येक प्रभागात कार्यकर्त्यांच्या ठोस जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत. निवडणुकीपर्यंत प्रत्येक कार्यकर्ता सक्रियपणे मैदानात उतरलेला दिसला पाहिजे, असे स्पष्ट निर्देश रविंद्र चव्हाण यांनी दिले. बूथ स्तरावर मतदारांशी संपर्क साधून त्यांचे प्रश्न समजून घेणे आणि त्यावर तात्काळ उपाययोजना सुचवणे, यावर विशेष भर देण्यात येणार आहे.

पालिका निवडणुकीत स्थानिक प्रश्न, विकासकामे आणि जनतेशी थेट संवाद हे प्रचाराचे प्रमुख मुद्दे असतील, असेही चव्हाण यांनी स्पष्ट केले. नागरी सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करून प्रचार करण्यात येणार आहे. तसेच केंद्र व राज्य सरकारच्या विविध विकास योजनांची माहिती घराघरात पोहोचवून त्याचा थेट लाभ जनतेपर्यंत कसा पोहोचतो आहे, हे कार्यकर्त्यांनी समजावून सांगावे, असे आवाहन केले. "जनतेचा विश्वास हाच भाजपचा सर्वात मोठा भांडवल आहे. हा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी प्रामाणिकपणे आणि सातत्याने काम करण्याची गरज आहे," असे सांगत चव्हाण यांनी कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण केला. आगामी काळात प्रचाराचा वेग वाढवण्यात येणार असून, बैठका, संवाद कार्यक्रम आणि प्रचार उपक्रमांच्या माध्यमातून उल्हासनगर पालिकेत सत्ता परिवर्तन घडवून आणण्याचा निर्धार भाजपने व्यक्त केला आहे.



### ■ उल्हासनगरचे राजकारण बहुरंगी ठरणार

**उल्हासनगरचे राजकारण पुन्हा एकदा तापले आहे. पालिका निवडणुकीसाठी १५ जानेवारीला मतदान होत असून, उमेदवारांची अंतिम यादी जाहीर होताच शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. यंदा भाजपा आणि शिंदे गट यांची अपेक्षित राजकीय युती न घडल्याने सत्तासंघर्ष रंगतदार ठरण्याची चिन्हे आहेत. मतदारांसमोर पर्यायांची रेलचेल असून ही निवडणूक खऱ्या अर्थाने बहुरंगी ठरणार आहे. तिकीट वाटपात अनेक इच्छुक डावलले गेल्याने असंतोष उफाळून आला असून, अनेक दिग्गजांनी अपक्ष उमेदवारी दाखल केली आहे. परिणामी, काही प्रभागांमध्ये थेट द्वंद्वाऐवजी त्रिकोणी, तर काही ठिकाणी चतुर्भुज लढती पाहायला मिळणार आहेत.**

# 'शिवतीर्थ फॅक्टर' निर्णायक ठरणार?

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांचा प्रचार शिगेला पोहोचलेला असताना, सर्वाधिक लक्ष वेधून घेतले आहे ते मनसे–शिवसेना (ठाकरे गट) युतीकडे. विशेषतः मुंबई महापालिकेच्या राजकारणात ठाकरे बंधूंच्या हालचालींना केवळ निवडणुकीपुरते नव्हे, तर भविष्यातील राजकीय समीकरणांच्या दृष्टीनेही मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे.

ठाकरे बंधूंनी २९ पैकी केवळ सात महापालिकांमध्ये युती जाहीर केली असली, तरी मुंबई ही त्यांच्या राजकीय प्रतिष्ठेची लढाई मानली जात आहे. त्यामुळेच या युतीच्या सभा किती, कुठे आणि कशा असतील, याबाबत प्रचंड उत्सुकता होती. सुरुवातीला मुंबईत तीन संयुक्त सभा होण्याची चर्चा होती. मात्र आता, राज ठाकरे यांच्या वक्तव्यामुळे ही युती केवळ एकाच संयुक्त सभेवर मर्यादित राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

विक्रोळी येथील नियोजित सभेबाबत निर्माण झालेला संभ्रम, उद्धव ठाकरे यांचा लालबाग शाखा दौरा आणि राज ठाकरे यांची स्वतंत्र हालचाल, यामुळे युतीतील प्रचाराची दिशा बदलल्याचे दिसते. मात्र, याचा अर्थ युती कमजोर आहे, असा काढता येत नाही. उलट, ११ जानेवारीला दादरच्या शिवतीर्थावर होणारी सभा ही 'हाय व्होल्टेज' राजकीय शक्तीप्रदर्शन ठरणार असल्याचे संकेत मिळत आहेत

राज ठाकरे यांनी शाखा भेटीदरम्यान केलेले वक्तव्य — "जो तोफखाना आहे, तो तिथे उडेल" — हे केवळ कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवणारे नसून, सत्ताधारी पक्षांना दिलेला थेट इशाराच मानला जात आहे. कमी सभा, पण अधिक प्रभावी संदेश देण्याची रणनीती ठाकरे बंधूंनी स्वीकारल्याचे चित्र आहे.

राजकीयदृष्ट्या पाहता, एकच सभा घेण्याचा निर्णय हा जोखमीचा असला तरी तो **'इव्हेंट पॉलिटिक्स'**च्या दृष्टीने अत्यंत प्रभावी ठरू शकतो. शिवतीर्थ ही केवळ जागा नसून ठाकरे कुटुंबाची राजकीय ओळख आहे. त्या ठिकाणी दोन्ही बंधू एकत्र येऊन कोणता सूर लावतात, कोणावर हल्ला करतात आणि मतदारांना कोणता भावनिक व राजकीय संदेश देतात, यावर मुंबईतील लढतीची दिशा ठरणार आहे. थोडक्यात, सभांची संख्या कमी असली तरी त्याचा राजकीय परिणाम मोठा असण्याची शक्यता आहे. त्यामुळेच मुंबई महापालिकेच्या रणधुमाळीत ठाकरेंची ही एकमेव सभा 'गेमचेंजर' ठरणार की केवळ प्रतीकात्मक शक्तीप्रदर्शन, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

तसं पाहिलं तर ठाकरे बंधूंनी केवळ एकच संयुक्त सभा घेण्याचा निर्णय जरी घेतला असला, तरी ती सभा संख्येपेक्षा प्रभावावर आधारित आहे. शिवतीर्थ ही जागा भावनिक, ऐतिहासिक आणि राजकीयदृष्ट्या ठाकरे कुटुंबाची ओळख आहे. त्यामुळे तिथे होणारी एकच सभा अनेक छोट्या सभांपेक्षा अधिक परिणामकारक ठरू शकते. त्यामुळे या सभेत केवळ प्रचार नव्हे, तर थेट राजकीय आक्रमण आणि स्पष्ट भूमिका मांडली जाणार आहे. सध्याच्या परिस्थितीत मतदार संभ्रमात असताना, ठाम आणि आक्रमक संदेश देणे हा मतदार ध्रुवीकरणाचा प्रभावी मार्ग ठरू शकतो. मात्र, या रणनीतीत जोखीमही आहे. एकाच सभेत अपेक्षित परिणाम साधला गेला नाही, किंवा संदेश अपेक्षेप्रमाणे जनतेपर्यंत पोहोचला नाही, तर त्याची भरपाई करण्यासाठी पुढे फारसा अवकाश राहणार नाही. त्यामुळे ही सभा यशस्वी ठरली तर गेमचेंजर, अपयशी ठरली तर प्रतीकात्मक शक्तीप्रदर्शन एवढ्यापुरतीच मर्यादित राहू शकते.

एकूणच पाहता, ठाकरे बंधू भावनिक मुद्दे, ओळखीचे स्थान आणि मर्यादित पण प्रभावी संवाद या त्रिसूत्रीवर खेळत आहेत. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत ही रणनीती मतदारांवर कितपत प्रभाव टाकते, हे शिवतीर्थवरील सभेनंतरच स्पष्ट होईल.

# महायुतीतील नेत्यांनी बोलताना भान राखावे – डॉ. श्रीकांत शिंदे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर :** उल्हासनगर महापालिका निवडणुकीत शिंदेंची शिवसेना आणि भाजप स्वतंत्रपणे निवडणूक लढवत असल्याने प्रचारात आरोप-प्रत्यारोपांना धार चढू लागली आहे. भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी शिवसेनेविरोधात केलेल्या आक्रमक वक्तव्याला शिवसेनेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी प्रत्युत्तर देत आमच्याकडेही बोलण्यासारखे खूप आहे, त्यामुळे भाजपच्या नेत्यांनी बोलताना भान राखावे, असा सल्ला दिला आहे. युतीतील नेत्यांनी एकमेकांविरूद्ध बोलताना संयम बाळगावा अशा सूचना असतानाही नरेंद्र पवारांच्या वक्तव्याने युतीत प्रचाराच्या सुरूवातीलाच बेबनाव होत असल्याचे चित्र आहे.

अंबरनाथ आणि बदलापूरप्रमाणेच उल्हासनगर महापालिका निवडणुकीमध्येही शिंदेंची शिवसेना आणि भाजप यांच्यात थेट लढत रंगत आहे. अर्ज माघारी घेण्याची मुदत संपल्यानंतर शहरात आता प्रचाराला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली आहे. प्रचाराच्या पहिल्याच दिवशी भाजपचे कल्याणचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी शिवसेनेवर भ्रष्टाचार आणि गुंडगिरीचे आरोप केले होते. हे करत असतानाच आम्ही उल्हासनगर शहरातून तुमचा सुपडा साफ करू असा इशारा पवार यांनी दिला होता. तसेच अंबरनाथ, बदलापूरनंतर उल्हासनगरमधूनही धनुष्यबाण नामशेष करू असे सांगत आमच्याकडे अनेक नेते आहेत असाही टोला त्यांनी लगावला होता. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती. या पार्श्वभूमीवर सोमवारी रात्री उल्हासनगर येथे प्रचारासाठी आलेले खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी पत्रकारांशी बोलताना नरेंद्र पवार यांच्या वक्तव्यावर नाराजी व्यक्त केली.

आमच्याकडेही अनेक बाबींवर बोलण्यासारखे आहे. मात्र युतीतील नेत्यांनी जबाबदारीने आणि संयमाने वक्तव्य करणे अपेक्षित आहे, असे सांगत त्यांनी भाजप नेतृत्वाला सूचक इशारा दिला. राज्यात काही महापालिका वगळता अनेक ठिकाणी शिवसेना आणि भाजप युतीत निवडणुका लढवत असून अनेक ठिकाणी युतीला यशही मिळाले आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे एकमेकांवर टीका टाळत असताना, स्थानिक पातळीवर काही नेत्यांकडून केले जाणारे आक्रमक वक्तव्य युतीसाठी अडचणीचे ठरू शकते, असा सूचक इशाराही शिंदे यांनी दिला. वरिष्ठ नेत्यांच्या भूमिकेचा विचार करून आपण काय बोलतोय याचे भान राखण्याची गरज आहे असेही पुढे खासदार श्रीकांत शिंदे म्हणाले. त्यामुळे येत्या काही दिवसांत प्रचारादरम्यान युतीतील नेते परस्परांवरील आरोप-प्रत्यारोप टाळतात का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.




# महापालिकांचा महासंग्राम

# प्रचारादरम्यान भाजप–शिवसेना कार्यकर्त्यांत वाद

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भाईंदर :** मिरा रोड येथील काशिमीरा परिसरात निवडणूक प्रचारादरम्यान भाजप आणि शिवसेना कार्यकर्ते समोरासमोर आल्याने वाद निर्माण झाल्याची घटना सोमवारी घडली. या घटनेची चित्रफीत समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, त्यामुळे परिसरात राजकीय चर्चांना उधाण आले आहे. मिरा–भाईंदर शहरात शिवसेना आणि भाजप हे दोन्ही पक्ष स्वबळावर निवडणूक लढवत असल्याने अनेक प्रभागांमध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १४ मध्ये प्रचार सुरू असताना दोन्ही पक्षांचे उमेदवार व कार्यकर्ते आमनेसामने आले आणि त्यातून वादाला तोंड फुटले. या वादात शिवसेना नेते प्रताप सरनाईक यांच्याविरोधात अपशब्द वापरण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. भाजप उमेदवाराच्या पतीकडून हे अपशब्द वापरले गेल्याचा दावा शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला असून, त्यानंतर दोन्ही बाजूंमध्ये शाब्दिक चकमक झाली. या प्रकारामुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी बंदोबस्त वाढवला होता. या प्रकरणी दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांकडून एकमेकांविरोधात पोलीस ठाण्यात तक्रारी अर्ज दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# वसई–विरार मध्ये ठाकूरांच्या साम्राज्याला सुरुंग !

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

वसई–विरार परिसरातील राजकारणात मोठी हालचाल पाहायला मिळत असून, हितेंद्र ठाकूर यांच्या बहुजन विकास आघाडीतून भाजपमध्ये प्रवेश केलेल्या नेत्यांना थेट उमेदवारी देत भाजपने बविआसमोर खुले आव्हान उभे केले आहे. भाजपने सात माजी नगरसेवकांसह आठ कार्यकर्त्यांना उमेदवारी दिली असून, एकूण १५ उमेदवार मैदानात उतरवल्याने स्थानिक राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. गेल्या विधानसभा निवडणुकीत बहुजन विकास आघाडीचे तिन्ही पारंपरिक बालेकिल्ले कोसळल्यानंतर भाजपचे मनोबल मोठ्या प्रमाणात वाढले आहे. या निकालानंतर वसई–विरारमध्ये गेली तब्बल ३५ वर्षे असलेली ठाकूर कुटुंबाची एकहाती सत्ता मोडीत काढण्याच्या दिशेने महायुतीने, विशेषतः भाजपने आक्रमक रणनीती आखली आहे. याच रणनीतीचा भाग म्हणून स्थानिक पातळीवरील प्रभावी नेते, माजी नगरसेवक आणि कार्यकर्त्यांना भाजपमध्ये सामावून घेत त्यांना थेट उमेदवारी देण्यात आली आहे. बविआतून भाजपमध्ये दाखल झालेल्या आयराम गटाला उमेदवारी देत भाजपने 'घरातीलच' नेत्यांच्या माध्यमातून ठाकूरांच्या बालेकिल्ल्याला सुरुंग लावण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, ही केवळ पक्षांतराची लाट नसून, भाजपने वसई–विरारमधील स्थानिक सामाजिक व राजकीय गणिते लक्षात घेऊन आखलेली दीर्घकालीन खेळी आहे. माजी नगरसेवक आणि अनुभवी कार्यकर्त्यांमुळे भाजपची संघटनात्मक ताकद वाढण्याची शक्यता असून, याचा थेट परिणाम आगामी महापालिका निवडणुक आणि निकालावर होऊ शकतो.

# कुणा हाती जाणार नवी मुंबईच्या चाव्या ?

## १४ गावांचा समावेश; तरीही नगरसेवकांची संख्या 'जैसे थे!'



**दै.ठाणेजीवनदीपवार्ता**

**नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेच्या स्थापनेला तीन दशकांहून अधिक काळ लोटला असला, तरी आगामी निवडणुकीपूर्वी जाहीर झालेल्या नव्या प्रभागरचनेमुळे शहराचे राजकारण पुन्हा एकदा ढवळून निघाले आहे. १ जानेवारी १९९२ रोजी अस्तित्वात आलेली नवी मुंबई महापालिका ही सिडकोने विकसित केलेल्या २९ गावांचे एकत्रीकरण करून निर्माण झाली होती. ग्रामपंचायतीतून थेट महानगरपालिकेत रूपांतरित होणारे हे देशातील पहिलेच उदाहरण ठरले होते. नव्या प्रभागरचनेनुसार १११ नगरसेवकांसाठी २८ प्रभाग निश्चित करण्यात आले आहेत. यापैकी २७ प्रभागांतून प्रत्येकी चार, तर एका प्रभागातून तीन नगरसेवक निवडून दिले जाणार आहेत. ही संख्या पूर्वीप्रमाणेच कायम ठेवण्यात आल्याने राजकीय वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. विशेष म्हणजे, कल्याण तालुक्यातील १४ गावांचा नवी मुंबई महापालिकेत नव्याने समावेश झाला असतानाही नगरसेवकांची संख्या वाढवण्यात आलेली नाही. लोकसंख्या वाढ, भौगोलिक विस्तार आणि नव्या भागांचा समावेश लक्षात घेता नगरसेवकांची संख्या वाढेल, अशी सर्वसाधारण अपेक्षा होती. मात्र निवडणूक आयोगाने ती अपेक्षा फोल ठरवली आहे. २०१५ मधील निवडणूकही १११ नगरसेवक आणि स्वतंत्र प्रभागरचनेनुसारच झाली होती. आता पुन्हा एकदा संख्या 'जैसे थे' ठेवत प्रभागांची फेररचना करण्यात आल्याने अनेक ठिकाणी प्रभागांची तोडफोड झाल्याची भावना प्रस्थापित नेत्यांमध्ये आहे. काहींचे प्रभावक्षेत्र तुटल्याचा आरोप होत असून, त्यामुळे राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही प्रभागरचना केवळ प्रशासकीय बदल नसून, ती थेट निवडणूक निकालांवर परिणाम करणारी ठरणार आहे. नव्या मतदारसंघांमध्ये नवीन चेहरे पुढे येणार की प्रस्थापितांचे वर्चस्व टिकणार, यावर आता सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे. थोडक्यात, नगरसेवक संख्या स्थिर असली तरी प्रभागरचनेतील बदल नवी मुंबईच्या राजकारणात मोठी उलथापालथ घडवू शकतो, त्यामुळे नवी मुंबईच्या सत्तेच्या चाव्या अखेर कुणाच्या हाती जाणार? हा प्रश्न शहराच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी येऊन ठेपला आहे.

# कल्याणमध्ये चक्क घोडेस्वारीतून प्रचार !

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

निवडणुकीत मतदारांचे लक्ष वेधून घेण्यासाठी उमेदवार वेगवेगळया आणि नाविन्यपूर्ण पद्धती वापरताना दिसत आहे. कुठे पदयात्रा, तर काही ठिकाणी, समाजमाध्यमांचा वापर, सांस्कृतिक कार्यक्रम, थेट संवाद सभा अशा विविध माध्यमांतून प्रचार केला जात आहे. या सर्व प्रयत्नांमुळे निवडणुकीचे वातावरण अधिकच उत्साही आणि चुरशीचे झाले असतानच कल्याण पश्चिमेत कराटेपटू आणि व्यायामपटू असलेले उमेदवार फैसल निजामुद्दिन जलाल यांनी सकाळच्या वेळेत घोडेस्वारीतून प्रचाराची अनोखी शैली अवलंबली आहे. दुर्गाडी किल्ला, गणेशघाट व आधारवाडी परिसरात दररोज सकाळी देखण्या घोड्यावरून प्रचार करताना नागरिकांचे लक्ष वेधले जात आहे. माजी नगरसेवक असलेले फैसल जलाल यांनी यापूर्वी अपक्ष तसेच मनसेकडून निवडणूक लढवली असून, सध्या ते शरदचंद्र पवार पक्षाकडून (राष्ट्रवादी) प्रभाग क्रमांक ८ मधून निवडणूक लढवत आहेत.

# मानवी साखळीद्वारे विद्यार्थ्यांची मतदान जनजागृती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या १५ जानेवारी रोजी होणाऱ्या निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी आज कल्याणमध्ये विद्यार्थ्यांनी भव्य 'मानवी साखळी' काढून जनजागृती केली. कल्याण पश्चिमेतील बिर्ला कॉलेज रोड आणि खडकपाडा परिसरात विद्यार्थ्यांनी हातात फलक व बॅनर घेऊन नागरिकांना मतदानाचे आवाहन केले. या उपक्रमात केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल, निवडणूक अधिकारी आणि विविध शाळांचे शिक्षक व विद्यार्थी सहभागी झाले होते. "विद्यार्थ्यांमार्फत पालकांपर्यंत मतदानाचा संदेश पोहोचावा आणि जनजागृती व्हावी, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे," असे आयुक्त अभिनव गोयल यांनी सांगितले.



# भिवंडी पोलिसांची मोठी कारवाई

## 55 लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** शहरात महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस गस्त सुरू असताना, गुन्हे शाखेने कल्याण रोड परिसरात सापळा रचून ५४ लाख ९९ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त केला आहे. या कारवाईत दोन टेम्पो आणि एका ट्रकसह एकूण ७७ लाख ९९ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, तीन चालकांना अटक करण्यात आली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक शीतल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली आसबिबी मशीद परिसरात ही कारवाई करण्यात आली. संजय मस्कर, अक्षय गुडेकर आणि अजीम वाहिद शेख अशी अटक केलेल्यांची नावे असून, भिवंडी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीराज माळी करत आहेत.

# भिवंडीत विविध मान्यवरांच्या उपस्थितीत 'पत्रकार दिन' उत्साहात साजरा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता




**पडघा :** कापड उद्योगाची यंत्रमाग नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भिवंडी येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत मराठी पत्रकार दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

भिवंडी पत्रकार संघाच्या वतीने भिवंडी पंचायत समिती सभागृहात पत्रकारितेचे जनक आद्य दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जंयती निमीत्त मराठी पत्रकार दिन कार्यक्रम ६ जानेवारी रोजी घेण्यात आला यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ग्रामपंचायत कर्मचारी युनियन महाराष्ट्र उपाध्यक्ष दत्तात्रेय भोईर तर प्रमुख पाहुणे म्हणून माहितीअधिकार महासंघ अध्यक्ष आत्माराम पाटील, अस्तित्व फाऊंडेशनच्या अध्यक्षा अक्षया पाटील, संचालीका अपेक्षा पाटील, वृषाली मोरे भिवंडी वकील संघटनेचे माजी अध्यक्ष अँड. दिनेश्वर पाटील, दैनिक स्वराज्य तोरणचे संपादक किशोर पाटील जेष्ठ पत्रकार फारूक मेमन,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचीव - प्रवीण गायकवाड उपस्थित होते. यावेळी भिंवडी पत्रकार संघाचे अध्यक्ष,पंढरीनाथ कुंभार यांनी पत्रकार संघाची विस्तृत माहिती देऊन बाळशास्त्री जांभेकर यांच्या जिवनकार्यावर प्रकाश टाकला तसेच पत्रकार आणी नागरीकांनी जागृत राहून सखोल अभ्यास करून आंदोलने उभारली पाहीजेत व विविध प्रश्न उचलुन विषय तडीस नेले पाहीजेत असे आपल्या प्रस्ताविक भाषणात सांगितले. निर्भीडपणे मत मांडणारा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणजे पत्रकार स्पष्ट बोलणारा पत्रकार तयार होणे गरजेचे असुन कुठल्याही घटनेचा पत्रकारांनी आवाज ऊठवल्यामुळे त्याला वाचा फुटते व पत्रकारांमुळेच प्रशासकीय काम सुरळीत चालते पत्रकारांकडे बघण्याचा समाजाचा वेगळा दृष्टीकोन असल्यामुळे ही निर्भीड पत्रकारिता कायम सुरू ठेवावी. असे आवाहन यावेळी अँड. पाटील यांनी आपल्या भाषणात केले. राजकारण्यांकडून पत्रकारांचा वापर केला जातो मात्र त्यांची कदर केली जात नाही. पत्रकारितेची ताकत मोठी असुन त्याचा योग्य वापर पत्रकारांनी केला पाहिजे.असे दत्तात्रेय भोईर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले यावेळी विवीध मॅराथॉन, धावण्याच्या स्पर्धेत गोल्ड मेडल मिळवणाऱ्या भिवंडी तालुक्यातील घोटगांव येथील अँथलेटीक्स प्रथमेश संजय पाटील यांचा विशेष सत्कार भिवंडी पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आला.तर उपस्थित पत्रकारांचा भेटवस्तू, डायरी, पेन, देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी भिवंडी पत्रकार संघाच्या माजी अध्यक्षा कुसुमताई देशमुख सचीव अफसर खान, दिपक हीरे, शिवाजी राऊत, विनोद पाटील, दिपक देशमुख, राजेंद्र काबाडी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र पाटील यांनी केले. तर आभार राजेंद्र काबाडी यांनी मानले.

# बिबट्या आल्याच्या अफवांवर विश्वास ठेवू नये

## वनक्षेत्रपाल सपना सोनार



## खोटी माहिती पसरवणाऱ्यावर कायदेशीर कारवाई करणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**पेण :** पेण तालुक्यातील काश्मिरे ते शहापाडा धरणाच्या रस्त्या दरम्यान ५जानेवारीला सकाळचे वेळेस फिरते वेळी गावातील लोकांना दिसुन आलेला वन्यप्राणी तसेच दिनांक ०६/०१/२०२६ रोजी शहापाडा धरणाच्या खालील बाजुस असणा-या ट्री हाऊस हायस्कुल व परिसरातील लोक तसेच विट भटटीत काम करणा-या मजुरांनी सांगितलेल्या बातमी वरुन जागेवर जाऊन वनक्षेत्रपाल पेण व वन अधिकारी यांनी तपासणी केली असता सदरच्या पाऊल खुणा हया बिबट्या वन्यप्राण्याच्या नसल्याची खात्री केली. त्यामुळे लोकांनी अफवांवरती विश्वास ठेवु नये. तसेच नागरीकांना सतर्क करण्यात येते कि, कोणीही सोशल मिडीयाच्या माध्यमातुन अफवा पसरविल्यास त्यांचेवर वन विभागाकडुन कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घेण्यात यावी. वनक्षेत्रपाल पेण (संरक्षण) सपना निंबा सोनार यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

# विभागीय क्रीडा महोत्सवाचे खोपोलीत उद्घाटन




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड :** सामाजिक न्याय विभागाच्या मुंबई विभागीय शासकीय वसतिगृह क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन प्रादेशिक उपायुक्त बाळासाहेब सोळंकी यांच्या हस्ते खोपोलीत उत्साहात पार पडले. ६ व ७ जानेवारी २०२६ या कालावधीत हा महोत्सव रंगणार आहे.

या महोत्सवात मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सात जिल्ह्यांतील ४०० हून अधिक विद्यार्थी व कर्मचारी सहभागी झाले आहेत. यामध्ये कबड्डी, खो-खो, बॅडमिंटन, व्हॉलीबॉल आणि क्रिकेट या खेळांच्या स्पर्धा रंगणार आहेत.रायगडचे समाज कल्याण सहाय्यक आयुक्त सुनील जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ ७ जानेवारी रोजी संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास विविध जिल्ह्यांचे सहाय्यक आयुक्त व मान्यवर उपस्थित होते.

# माहुलीच्या जंगलात वाट चुकलेल्या मुलींची वाशिंद पोलिसांकडून सुखरूप सुटका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता




**शहापूर(नरेंद्र पाटील) :** माहुली किल्ल्यावर ट्रेकिंगसाठी आलेल्या मुंबईतील एका ग्रुपमधील दोन मुली ४ जानेवारी रोजी सायंकाळी वाट चुकल्या. घनदाट जंगल, अंधार आणि हिंस्र प्राण्यांची भीती अशा भीषण परिस्थितीत वाशिंद पोलिसांनी स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने शोधमोहीम राबवून या मुलींना सुरक्षित बाहेर काढले.

**नेमकी घटना काय?**

मुंबई येथील २३ जणांचा एक ग्रुप वाशिंद जवळील वांद्रे (पिवळी) मार्गे माहुली किल्ल्याच्या शेवटच्या सुळक्यावर ट्रेकिंगसाठी आला होता. सायंकाळी गडावरून खाली उतरताना दोन मुली रस्ता चुकल्या आणि मुख्य ग्रुपपासून वेगळ्या झाल्या. मोबाईलला रेंज कमी असल्याने आणि सर्वत्र अंधार पसरल्याने मुली प्रचंड घाबरल्या होत्या. मात्र, त्यांनी प्रसंगावधान राखून '११२' क्रमांकावर मदतीसाठी कॉल केला.

**पोलिसांची तत्परता:**

घटनेचे गांभीर्य ओळखून वासिंद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन हुंदळेकर यांनी तातडीने सूत्रे हलवली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार विठ्ठल बिन्नर, पोलीस कॉन्स्टेबल भिकन भिल्ल आणि नितीन उगले यांचे पथक तात्काळ वांद्रे-पिवळी गावाकडे रवाना झाले.

**ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य:**

पोलिसांनी पिवळी येथील पोलीस पाटील चंद्रकांत घरत, सामाजिक कार्यकर्ते संतोष पादीर आणि रवींद्र झुगरे यांच्याशी संपर्क साधून मुलींच्या संभाव्य ठिकाणाचा अंदाज बांधला. पोलीस आणि ग्रामस्थांच्या संयुक्त पथकाने रात्रीच्या अंधारात शोधमोहीम राबवून रात्री ८:४५ च्या सुमारास दोन्ही मुलींना शोधून काढले.

**सर्वत्र कौतुक:**

वेळेवर मदत मिळाल्याने या दोन्ही मुलींना त्यांच्या ग्रुप सदस्यांकडे सुखरूप सोपवण्यात आले. संकटाच्या वेळी देवदूतासारख्या धावून आलेल्या वासिंद पोलीस आणि ग्रामस्थांचे मुंबईतील ट्रेकर्सनी आभार मानले आहेत. पोलीस निरीक्षक सचिन हुंदळेकर व त्यांच्या टीमच्या या धाडसी कामगिरीचे संपूर्ण शहापूर तालुक्यात कौतुक होत आहे.

**ट्रेकर्ससाठी आवाहन:** अशा दुर्गम भागात मदत हवी असल्यास महाराष्ट्र पोलिसांच्या ११२ पोर्टल वर संपर्क साधावा किंवा स्थानिक पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.




# 'आपले सरकार पोर्टल'वरील २ हजार ८४० तक्रारी निकाली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** राज्य सरकारने सुरु केलेल्या आपले सरकार २.० वरील तक्रारी निकाली काढण्यासाठी जिल्हा परिषद, ठाणे सामान्य प्रशासन विभागाकडून विशेष मोहीम राबवण्यात आली आहे. जिल्हा परिषदेस आपले सरकार पोर्टलवर २ हजार ८९५ तक्रारी प्राप्त झाल्या असून २ हजार ८४० तक्रारी निकाली काढल्या आहे तर फक्त ३८ तक्रारी पुढील कार्यवाहीसाठी क्षेत्रीय स्तरावर विस्तृत अहवाल मागणीसाठी प्रलंबित आहेत. या पोर्टलद्वारे ग्रामस्थांना आपल्या तक्रारी ऑनलाइन दाखल करणे तसेच त्याची सद्यस्थिती जाणून घेण्याची सुविधा उपलब्ध असून ९८ टक्के तक्रारी निकाली काढण्यात यश मिळवले आहे.

शासन निर्देशानुसार २१ दिवसांच्या आत तक्रारीचे निराकरण करणे अनिवार्य असून मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या मार्गदर्शनाने जिल्हा परिषदेकडे येणाऱ्या तक्रारी सरासरी २१ दिवसांच्या आतच निकाली काढण्यात येत असून सर्व विभागातील अधिकारी-कर्मचारी यांनी यासाठी विषेश प्रयत्न केले आहेत.आपले सरकार पोर्टलवरील प्राप्त तक्रारींचा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्येक सोमवारी साप्ताहिक सखोल आढावा घेण्यात येतो. तक्रारदाराची तक्रार मांडणी व्यवस्थित न झाल्यास किंवा म्हणणे न समजल्यास तक्रारदारास दूरध्वनीवर तात्काळ संपर्क केला जातो. तक्रारींचे निवारण ठाणे जिल्हा परिषदेकडून उत्तमप्रकारे होत असल्याबाबत १०७२ तक्रारदार यांनी आपले अभिप्राय नोंदवले असून त्यापैकी १०६८ तक्रारदार यांनी समाधान व्यक्त केले आहे, अशी माहिती उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे यांनी दिली.

राज्य शासनाच्या १५० दिवस कार्यक्रम या अभियान अंतर्गत आपले सरकार पोर्टलवरील तक्रारी निकाली काढण्यासाठी देखील विषेश भर देण्यात येत आहे.

# वरसई शाळा टिकवण्यासाठी ग्रामस्थांचे योगदान आदर्शवत : अॅड बापुसाहेब नेने




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** वरसई सारख्या ग्रामीण भागातील शाळेच्या वाटचालीचा आढावा घेतला असता या भागातील लोकांनी शाळा टिकून ठेवल्याचे मोठे योगदान आहे, आज ही माजी विद्यार्थीची उपस्थिती पाहून या संस्थेवर असलेले प्रेम यातून स्पष्ट झाले. भविष्यात या भागत जूनियर कॉलेज कसे काढता येईल यासाठी प्रयत्न करणार तसेच माजी विद्यार्थ्यांचे यश आणि विद्यमान विद्यार्थ्यांची गुणवत्ता यांचे कौतुक केले. "ही शाळा केवळ शिक्षण देणारी संस्था नसून समाज घडविण्याचे कार्य करत आहे," असे वक्तव्य पेण एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष बापूसाहेब नेने यांनी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना व्यक्त केले

पेण एज्युकेशन सोसायटीची कै.पु.ग गोडसे विद्यामंदिर वरसई या.पेण या शाळेच्या स्थापनेला ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित करण्यात आलेला सुवर्ण महोत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि दिमाखात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे भव्य आयोजन, शिस्तबद्ध नियोजन आणि विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे पेण एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष ,माजी अध्यक्षा , पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ,संचालक , माजी मुख्याध्यापक , शिक्षकवर्ग तसेच माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी उपस्थितांनी सुवर्ण महोत्सवाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजक समितीचे अभिनंदन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# "दिलके झरोकेमे" कार्यक्रमात श्रवणीय गाण्यांची पर्वणी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** करण या अंध गायकासह अन्य गायकांनी येथील आचार्य अत्रे रंगमंदिरात रविवारी पद्मावती एन्टरटेन्मेण्ट आयोजित "दिलके झरोकेमे" या कार्यक्रमात हिंदी चित्रपटसृष्टीतील सुवर्णयुगामधील गाजलेल्या गाण्यांची अनुभूती श्रोत्यांना दिली.

तू इस तरह से मेरे, ओ सनम तेरे हो गए हम, इक अजनबी हसीना से, लिखे जो खत तुझे, किसी राहपे किसी मोडपर, यादोंकी बारात, दिलके झरोकेमे तुझको बिठाकर, हाल कैसा है जनाब का, देखाना हाय रे सोचाना, मै शायर तो नही, परदा है परदा, बदन पे सितारे लपेटे हुए ही व अशी एकाहुन एक सरस गाणी रसिकांसमोर सादर करण्यात आली. ४ जानेवारी हा अंधांसाठी ब्रेल लिपीचा शोध लावणाऱ्या फ्रेंच शिक्षक लुई ब्रेल याचा जन्मदिवस असल्याने करण बालानी या गुणी अंध गायकाला पद्मावती एण्टरटेन्मेण्टच्या प्रदीप नायर यांनी गाण्याची संधी देऊन एक वेगळेच औचित्य साधले होते.

जुगल किशोर, प्राजक्ता चौबळ, इति कार, सौरभ, शिल्पा, संतोष या गायकांनी तडफदारपणे विविध गीते सादर केली. विशाल सकपाळ यांच्या संगीत संयोजनाने कार्यक्रमात रंगत भरली. रविवारचा दिवस असल्याने गाण्यांच्या चाहत्यांनी मोठी गर्दी करुन या प्रयोगाला प्रतिसाद दिल्याचे पाहायला मिळाले.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024